महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे  Rs.2/-  कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

रविवार ❖ २७ एप्रिल २०२५ ❖वर्ष ६ ❖अंक २९८ ❖ पाने - ४ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

## नागरिकांना सुकर व सहज परिवहन सेवा उपलब्ध करून द्या

**- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

- **शहरांमधील परिवहन सेवेच्या विकासासाठी स्वतंत्र एकात्मिक महानगर वाहतूक प्राधिकरण**
- **प्राधिकरण स्थापन करण्याचा कायदा करण्यापूर्वी हरकती,सूचना मागवा**



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : महानगरांमध्ये वाहतुक कोंडीची समस्या कायमस्वरूपी सोडविण्यासाठी शासन विविध पातळ्यांवर काम करीत आहे. यामध्ये किफायतशीर सहज आणि सुलभरित्या उपलब्ध होणारी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था महत्त्वाची भूमिका बजावित आहे. नागरिकांच्या 'इज ऑफ लिव्हिंग'साठी शहरी परिवहन सेवेमध्ये आमूलाग्र बदल आवश्यक आहे. त्यासाठी एकात्मिक महानगर वाहतूक प्राधिकरण (युनिफाईड मेट्रोपॉलिटीन ट्रान्सपोर्ट अथॉरिटी) स्थापन करावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. या प्राधिकरणाचा कायदा करण्यापूर्वी त्यावर जनतेच्या सूचना व हरकती घेऊन अंतिम निर्णय घेण्याचेही त्यांनी सूचित केले.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, सध्या वेगवेगळया महानगरनगरांमध्ये महापालिका, राज्य परिवहन महामंडळ, रेल्वे, मेट्रो आदी यंत्रणांच्या माध्यमातून परिवहन सेवा कार्यान्वित आहेत. प्रवासीभिमुख परिवहन सेवेसाठी सुसूत्रीकरण असणे गरजेचे आहे. महानगरांमधील परिवहन सेवेच्या विकास व विस्तारासाठी एकात्मिक महानगर वाहतूक प्राधिकरण स्थापन करणे गरजेचे आहे. या प्राधिकरणाच्या माध्यमातून विविध परिवहन सेवांचे एकच भाडे, शहरांमध्ये सुरू असलेले परिवहन प्रकल्प आदींबाबत समन्वय साधणे सोयीचे होईल.मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, प्राधिकरणाच्या माध्यमातून प्रभावी कामकाजासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी स्वतंत्र पद असावे. सध्या परिवहन सेवांसंदर्भात अस्तित्वात असलेले राज्याचे कायदे, नियम, केंद्र शासनाचे कायदे, विविध नियम यामध्ये अधिक्रमित होणार नाही, याची काळजी या प्राधिकरणाच्या कायद्यामध्ये घ्यावी. शहरात सुरू असलेले परिवहन संदर्भातील प्रकल्प गतीने पूर्ण होण्यासाठी एकच नियामक यंत्रणा असावी. यासाठी हे प्राधिकरण महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. नागरिकांना सुकर व सहज परिवहन सेवा 'लास्ट माईल कनेक्टिव्हिटी' च्या स्वरूपात उपलब्ध व्हावी, यादृष्टीने प्राधिकरणाचे काम असावे.

या प्राधिकरणात सर्व महानगरपालिकांचे महापौर, आयुक्त यांचा समावेश असावा. शहरातील परिवहन सेवा सुरळीत व सहज उपलब्ध होण्यासाठी प्राधिकरण नियोजन करेल. परिवहन सेवांची अंमलबजावणी संबंधित महापालिकडेच राहील. केवळ नियोजन, विकासाची बाब प्राधिकरणाकडे असेल. या प्राधिकरणांतर्गत कार्यकारी समिती असावी. शहरांमध्ये परिवहन सेवेचे विस्तार आणि नियोजन करताना भविष्यात प्राधिकरण शासनाला सल्लागार म्हणूनही काम करेल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

सह्याद्री अतिथीगृह येथे एकात्मिक महानगर वाहतूक प्राधिकरणबाबत बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अप्पर मुख्य सचिव (परिवहन) संजय सेठी, ठाणे महानगरपालिका आयुक्त सौरभ राव, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर अतिरिक्त आयुक्त अश्विन मुदगल, बेस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीनिवासन आदी उपस्थित होते.

## जिल्हाधिकारी कार्यालयात सेवा हक्क दिनाचं आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : सामान्य प्रशासन विभागाच्या दि.01 एप्रिल 2025 रोजीच्या शासन निर्णय क्र.GAD/९४/२०२४-Lokshahidin अन्वये दि.28 एप्रिल हा दिवस "सेवा हक्क दिन" म्हणून साजरा करण्यास मान्यता दिली आहे. तसेच मुख्य आयुक्त राज्य सेवा हक्क आयोग, मुंबई यांच्या पत्रान्वये दि.28 एप्रिल 2025 रोजी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 च्या अंमलबजावणीस दहा वर्ष पूर्ण होत असल्याने, या दशकपूर्तीचे औचित्य साधून जिल्हास्तरावर तसेच ग्रामपातळीवर विशेष उपक्रम राबविण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.

त्यानुषंगाने दि.28 एप्रिल 2025 रोजी जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या अध्यक्षतेखाली पाचवा मजला, समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथे सकाळी 11 वाजता "सेवा हक्क दिवस" निमित्ताने एकत्रित शपथ घ्यावयाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी यांनी दि.28 एप्रिल 2025 रोजी वेळेवर उपस्थित रहावे, असे आवाहन उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) हरिश्चंद्र पाटील यांनी केले आहे.

## केडीएमसी आयुक्त अभिनव गोयल यांनी घेतला मान्सूनपूर्व कामांचा आढावा




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या दालनात मान्सूनपूर्व तयारी संदर्भातील आढावा बैठक शुक्रवारी पार पडली. या बैठकीत शहरातील विविध प्रभागांमध्ये येत्या पावसाळयाच्या पार्श्वभूमीवर आवश्यक उपाययोजनांबाबत सखोल चर्चा झाली. या बैठकीत आयुक्तांनी लवकरात लवकर नाले सफाई पूर्ण करून त्यामध्ये वाढलेला गाळ प्राथमिक टप्प्यातच उचलण्याचे निर्देश दिले. तसेच मोठ्या, मध्यम नाल्यांबरोबरच लहान गटारांच्या जवळील जीव्हीपी ठिकाणी दैनंदिन स्वच्छता करण्याचे आदेश देण्यात आले.

पावसाचे पाणी ज्या भागांमध्ये साचते असे भाग लक्षात घेऊन, त्या ठिकाणी अत्यावश्यक सेवा सुरळीत ठेवण्यासाठी स्वतंत्र प्रभाग पातळीवर विशेष टीम तयार करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. यामुळे पावसाळ्यात महापालिका क्षेत्रात पाणी साचण्याच्या समस्या कमी होतील, असे आयुक्तांनी सूचित केले. महापालिकेच्या सर्व संबंधित विभागांनी या सूचनांची अंमलबजावणी तत्काळ सुरू करावी, असे आदेश आयुक्तांनी संबंधित अधिकारांना दिले.

## समृद्धी बाधित शेतकऱ्यांचा आमरण उपोषणाचा निर्धार

**महाराष्ट्र दिनी बसणार समृद्धी महामार्गावर**



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : मागील सन २०१७ ते २०२५ पर्यंत समृध्दी महामार्ग शहापूर तालुक्यातील अंदाड येथील भूसंपादीत झालेल्या सात शेतक-यांना आजपर्यंत मोबदला मिळालेला नसल्यामुळे त्यांनी १ मे रोजी समृद्धी महामार्गांवर बसून आमरण उपोषणाचा इशारा तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे.

स्व.बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गसाठी शेतकरी गुलाब मंगल भोईर, बेबीबाई दत्तु पवार, सविता काशिनाथ भडांगे, पुनम पंढरीनाथ मोगरे, जयराम नाथा गडगे, यशवंत सिताराम पंडित, निराबाई चिमन भेरे यांच्या जमिनी बाधित झाल्या असून त्यांना मागील सात वर्षापासून समृध्दी बाधित जमिनीचा मोबदला मिळालेला नाही.याबाबत तहसिल कार्यालय शहापूर, भिवंडी उपविभागीय अधिकारी तसेच जिल्हाधिकारी ठाणे यांचेशी संपर्क करुन त्यांच्या नावावर असणाऱ्या जमिनी सरकारी करुन आम्हाला मोबदला दिला नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.तथापी यासंदर्भात राज्यपाल यांचे पत्र देखील आले असल्याचे त्यांचे म्हणणे आहे.वारंवार पाठपुरावा करूनही कोणत्याही शेतकऱ्यांना मोबदला मिळाला नसल्याचे निवेदनात म्हटले आहे. दरम्यान मागील ४ वर्षात २ शेतकऱ्यांचा मोबदला प्रतिक्षेत व जमिन संपादित झाल्याने मानसिक धक्क्याने मृत्यु झाला असून उर्वरित शेतकरी समृध्दी महामार्ग येथे आमरण उपोषण करणार आहेत.

> **शेतकऱ्यांशी माझं बोलणं झालं आहे.ते उपोषण करणार नाहीत.**
> **- परमेश्वर कासुले तहसीलदार शहापूर**

## बदलापूर नगरपालिकेचा 33 वा वर्धापनदिन जल्लोषात साजरा




**पालिका कर्मचाऱ्यांच्या कलाविष्काराने कार्यक्रमात बहार**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

बदलापूर : कुळगाव-बदलापूर नगर परिषदेचा 33वा वर्धापनदिन सोहळा बदलापुरातील गौरी हॉल इथे पार पडला. वर्धापनदिनानिमित्त धमाल, मस्ती आणि मनोरंजनाचा महाउत्सव या टॅगलाईनखाली उमेद 2025 हा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाच्या निमित्तानं नगरपालिकेच्या 27 सेवांचा शुभारंभ आमदार किसन कथोरे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी शहरात अंडरग्राऊंड इलेक्ट्रसिटी आणि नाट्यगृहासाठी प्रयत्न करण्याची विनंती मुख्याधिकारी मारुती गायकवाड यांनी आपल्या प्रास्ताविकातून केली. पालिकेला सर्वतोपरी सहकार्य करण्याचं आश्वासन आमदार किसन कथोरे यांनी दिलं. तसंच मुख्याधिकारी मारुती गायकवाड हे आपल्या कामांच्या माध्यमातून सिक्सरवर सिक्सर मारत असून त्यांनी यापुढेही असंच काम करावं अशा शब्दात किसन कथोरे यांनी मुख्याधिकाऱ्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप दिली. यावेळी पालिकेच्या कर्मचाऱ्यांनी एकापेक्षा एक सुंदर गाणी आणि नृत्याविष्कार सादर करत धमाल उडून दिली.- कर्मचाऱ्यांचा स्टेजवरील परफॉर्मन्स पाहिल्यानंतर प्रेक्षकांच्या उत्साहाला उधाण आलं होतं. संगीताच्या तालावर थिरकत त्यांनीही आपल्या सहकाऱ्यांचा आनंद द्विगुणित केलाया कार्यक्रमाला आ. किसन कथोरे, माजी नगराध्यक्ष वामन म्हात्रे, अंबरनाथचे मुख्याधिकारी उमाकांत गायकवाड, भाजप गटनेते राजन घोरपडे, माजी नगराध्यक्ष राम पातकर, भाजप शहराध्यक्ष किरण भोईर, शरद तेली, श्रीधर पाटील, संजय भोईर, प्रमिला पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

## जीवनदीप महाविद्यालय गोवेली येथे पदवी प्रदान समारंभ संपन्न




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

गोवेली : जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई संचलित कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली येथे आज दिनांक 26 एप्रिल 2025 रोजी पदवी प्रधान समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. आपल्या शैक्षणिक वाटचालीतील बारावीनंतर पदवीपर्यंतचे शिक्षण हा खूप महत्त्वाचा टप्पा असतो. अनेक विद्यार्थी दरवर्षी पदवी प्राप्त करतात. आज या समारंभासाठी तसेच पदवी प्राप्त विद्यार्थ्यांना गौरविण्यासाठी प्रमुख अतिथी म्हणून मुरबाड मतदार संघाचे आमदार किसनजी कथोरे, मुंबई विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ.अशोक फरडे, मुंबई विद्यापीठाचे सिनेट मेंबर कल्पेश भोईर उपस्थित होते. यावेळेस जवळपास २५० विद्यार्थ्यांना पदवी देऊन गौरविण्यात आले. तसेच त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सतीश लकडे यांनी केले. यावेळेस शिक्षण प्रेमी, जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष रवींद्र घोडविंदे , सामाजिक कार्यकर्ते चिंतामण मगर, भाजपा युवा नेते संजय शेलार,जीवनदीप संस्थेचे संचालक शांताराम भोईर , प्राचार्य डॉ.के.बी कोरे, उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे, सर्व प्राध्यापक वर्ग आणि विद्यार्थी यांच्या उपस्थितीमध्ये हा कार्यक्रम संपन्न झाला.

## भिवंडी महापालिका क्षेत्रात १८ अनधिकृत शाळा




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : महापालिका क्षेत्रात तब्बल १८ प्राथमिक शाळा अनधिकृत आहेत. या शाळांमध्ये आपल्या पाल्यांचे प्रवेश घेऊन त्यांच्या शैक्षणिक वर्षाचे नुकसान करू नये, असे आवाहन पालिका प्रशासनाने केले आहे. रॉयल इंग्रजी शाळा, नोबेल इंग्रजी शाळा, अलरजा उर्दू प्राथमिक शाळा, मराठी प्राथमिक शाळा टेमघर, इंग्रजी प्राथमिक व माध्यमिक शाळा टेमघर, द लर्निंग प्राथमिक शाळा, एकता इंग्रजी पब्लिक शाळा, फातमा नगर नागांव, एकता उर्दू पब्लिक शाळा, ए आर रेहमान उर्दू प्राथमिक शाळा, जवेरिया उर्दू प्राथमिक शाळा, विवेकानंद इंग्रजी माध्यमिक शाळा, डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम इंग्रजी प्राथमिक शाळा, अलहिदाया पब्लिक प्राथमिक शाळा, तहजीब इंग्रजी प्राथमिक शाळा, इकरा इस्लामिक मकतूब शाळा, कैसर बेगम इंग्रजी शाळा, फरहान इंग्रजी प्राथमिक शाळा, गीतांजली माध्यमिक शाळा अशा भिवंडी पालिका क्षेत्रांत अनधिकृत शाळा जाहीर करण्यात आल्या आहेत. पालिका क्षेत्रात असलेल्या अनधिकृत शाळांवर दंडात्मक कारवाईची नोटीस बजावली असून अशा शाळांवर लवकरच फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येणार आहे. अशा शाळांमधील विद्यार्थ्यांचे नजीकच्या शाळांमध्ये समायोजन करण्यात येईल, असे पालिका प्रशासनाच्या प्राथमिक शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.

## त्या तीन डोंबिवलीकर कुटुंबियांना सरकारने मदत करावी

**माजी खासदार राजन विचारे यांनी घेतली कुटुंबियांची भेट**



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : अतिशय वेदनादायक घटना घडली आहें. सरकारने स्व. संजय लेले यांच्या मुलाला सरकारी नोकरी दिली पाहिजे. देशावर आलेले हे संकट आहे. त्या तीन कुंटूबाला मदत मिळायाला हवी. त्या दृष्टीकोनातून सर्वानी पाहिले पाहिजे. सरकार जी भूमिका घेईल त्याला आमचा पाठींबा आहे असे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे माजी खासदार राजन विचारे यांनी डोंबिवलीत आपले मत व्यक्त केले. विचारे यांनी शनिवारी 26 तारखेला स्व. संजय लेले, स्व. हेमंत जोशी आणि स्व.अतुल मोने यांच्या कुटुंबियांची भेट घेतली. यावेळी शिवसेना नेते राजन साळवी, उपनेते विजय साळवी, शिवसेना कल्याण लोकसभा जिल्हा प्रमुख दीपेश म्हात्रे, कल्याण लोकसभा जिल्हा संघटक तात्या माने, शहर प्रमुख प्रकाश तेलगोटे, युवासेना विधानसभा अदित्य पाटील, उपविधानसभा ऋतुनील पावसकर, शहर अधिकारी प्रसाद तुकूल, नितीन पवार, शाम चौगुले, प्रमोद कांबळी,अनिल मुठ्ठा, विलास म्हात्रे, प्रियांका विचारे, सुप्रिया चव्हाण, सुरेखा सावंत, राजेंद्र सावंत आदी शिवसैनिक उपस्थित होते.

## महाराष्ट्रातील ५०० पर्यटक आतापर्यंत राज्यात दाखल


- **१८४ प्रवाशांना घेऊन राज्य सरकारची दोन विशेष विमाने पोहोचली**
- **२३२ प्रवाशांसाठी उद्या आणखी एक विशेष विमान**
- **मुख्यमंत्र्यांनी घेतला गिरीश महाजनांकडून आढावा, लष्करी रुग्णालयातील डॉक्टरांशी संवाद**
- **मंत्रालयात विशेष कक्ष, महाराष्ट्र सदनातूनही समन्वय**



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई :पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निर्देश दिल्यानंतर विविध प्रयत्नांतून गेल्या 2 दिवसात आतापर्यंत सुमारे 500 पर्यटक राज्यात परतले आहेत. राज्य सरकारने इंडिगो आणि एअर इंडिया अशी दोन विशेष विमाने पर्यटकांसाठी केली होती, त्यातून 184 पर्यटक मुंबईत दाखल झाले आहेत. दरम्यान, आणखी 232 प्रवाशांसाठी उद्या एका विशेष विमानाची व्यवस्था राज्य सरकार करीत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेनंतर आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांना तातडीने काश्मिरला जाण्यास सांगितले होते. गिरीश महाजन यांच्याकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज एकूणच स्थितीचा आढावा घेतला. उद्यासाठी आणखी विमाने करायची असतील, तर करा, त्याचा खर्च राज्य सरकार देईल, असे त्यांनी सांगितले. गिरीश महाजन यांनी लष्कराच्या रुग्णालयात उपचार घेत असलेल्या महाराष्ट्रातील पर्यटकांची भेट घेतली, तेव्हा देवेंद्र फडणवीस यांनी व्हीडिओ कॉलवर त्या पर्यटकांशी संवाद साधला आणि उपचार करणाऱ्या तेथील डॉक्टरांचे आभारही मानले.



काश्मिरातील महाराष्ट्राच्या पर्यटकांना परत आणण्यासाठी मंत्रालय, मुख्यमंत्री कार्यालय आणि महाराष्ट्र सदनातील कक्ष अशी त्रिस्तरिय यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली असून, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या विनंतीवर काम केले जात आहे. काही पर्यटकांची कालिका धाम, जम्मू येथे राहण्याची व्यवस्था केली गेली. अमरावती येथील सुमारे 14 पर्यटक येथे थांबले होते. काही पर्यटक मिळेल त्या व्यवस्थेने जम्मूवरुन दिल्लीकडे रवाना झाले असून, त्यांची दिल्ली येथे व्यवस्था करण्यात येत आहे. उद्या काश्मिरातून येणाऱ्या विशेष विमानात अकोला, अमरावती येथील पर्यटक असणार आहेत. दिल्लीत महाराष्ट्र सदनात प्रवाशांच्या याद्या सातत्याने तयार केल्या जात असून, गरज पडली तर परवाही विशेष विमान करण्याची तयारी राज्य सरकारतर्फे करण्यात येत आहे.



# गीतासार



## अध्याय ९
## राजविद्याराजगुह्ययोगः

अहं क्रतुरहं यज्ञः स्वधाहमहमौषधम् ।
मन्त्रोऽहमहमेवाज्यमहमग्निरहं हुतम्
॥ ९-१६ ॥

श्रौतयज्ञ मी आहे, स्मार्तयज्ञ मी आहे, पितृयज्ञ मी आहे, वनस्पती, अन्न व औषध मी आहे. मंत्र मी आहे, तूप मी आहे, अग्नी मी आहे आणि हवनाची क्रियाही मीच आहे. ॥ ९-१६ ॥

पिताहमस्य जगतो माता धाता
पितामहः । वेद्यं पवित्रमोङ्कार ऋक्साम
यजुरेव च ॥ ९-१७ ॥

या जगाला धारण करणारा व कर्मफळ देणारा, आई-वडील, आजोबा, जाणण्याजोगा पवित्र ॐ कार, तसेच ऋग्वेद, सामवेद आणि यजुर्वेदही मीच आहे. ॥ ९-१७ ॥

गतिर्भर्ता प्रभुः साक्षी निवासः शरणं
सुहृत् । प्रभवः प्रलयः स्थानं निधानं
बीजमव्ययम् ॥ ९-१८ ॥

प्राप्त होण्याजोगे परमधाम, भरण-पोषण करणारा, सर्वांचा स्वामी, शुभाशुभ पाहणारा, सर्वांचे निवासस्थान, शरण जाण्यास योग्य, प्रत्युपकाराची इच्छा न करता हित करणारा, सर्वांच्या उत्पत्ती-प्रलयाचे कारण, स्थितीला आधार, निधान आणि अविनाशी कारणही मीच आहे. ॥ ९-१८ ॥

तपाम्यहमहं वर्षं निगृह्णाम्युत्सृजामि च
। अमृतं चैव मृत्युश्च सदसच्चाहमर्जुन
॥ ९-१९ ॥

मीच सूर्याच्या रूपाने उष्णता देतो, पाणी आकर्षून घेतो व त्याचा वर्षाव करतो. हे अर्जुना, मीच अमृत आणि मृत्यू आहे, आणि सत् व असत् सुद्धा मीच आहे. ॥ ९-१९ ॥

त्रैविद्या मां सोमपाः पूतपापा यज्ञैरिष्ट्वा
स्वर्गतिं प्रार्थयन्ते । ते पुण्यमासाद्य
सुरेन्द्रलोकमश्नन्ति दिव्यान्दिवि
देवभोगान् ॥ ९-२० ॥

तिन्ही वेदांत सांगितलेली सकाम कर्मे करणारे, सोमरस पिणारे, पापमुक्त लोक माझी यज्ञांनी पूजा करून स्वर्गप्राप्तीची इच्छा करतात; ते पुरुष आपल्या पुण्याईचे फळ असणाऱ्या स्वर्गलोकाला जाऊन स्वर्गात देवांचे भोग भोगतात. ॥ ९-२० ॥

# मराठी मुलांची प्रेरणादायी कामगिरी




केंद्रीय लोकसेवा आयोगाने ( युपीएससी ) नागरी सेवा परीक्षा - २०२४ चा अंतिम निकाल जाहीर केला. केंद्रीय लोकसेवा आयोगाची ही परीक्षा अतिशय प्रतिष्ठेची समजली जाते. दरवर्षी विविध पदांकरिता आयोगाकडून परीक्षा घेतली जाते. दरवर्षी लाखो विद्यार्थी ही परीक्षा देतात. युपीएससीने २०२४ च्या परीक्षेसाठी आयएएस, आयपीएससह ११३२ पदांसाठी भरती जाहीर केली होती. यामध्ये १००९ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. यात ७२५ पुरुष आणि २८४ महिलांचा समावेश आहे. म्हणजेच ही परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्यात महिलांची संख्याही लक्षणीय आहे. महिलांचे हे यश नक्कीच सुखावणारे आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांत महाराष्ट्रातील ९० हून अधिक विद्यार्थ्यांत समावेश आहे. पहिल्या शंभर यशस्वी विद्यार्थ्यांत ७ मराठी विद्यार्थी आहेत. महाराष्ट्रासाठी ही अभिमानाची बाब आहे. पूर्वी या परीक्षेत यशस्वी होणाऱ्या उमेदवारांत मराठी विद्यार्थ्यांची संख्या नगण्य होती पण मागील काही वर्षांपासून या परीक्षेतही मराठी मुलांनी बाजी मारून मराठी मुलेही कशात कमी नाही हे दाखवून दिले आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाची ही परीक्षा अतिशय कठीण असते. नागरी सेवेमधील ही सर्वोच्च परीक्षा असून या परीक्षेत यशस्वी झालेले विद्यार्थी पुढे जाऊन प्रशासकीय अधिकारी होतात. ही परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी विद्यार्थी खूप मेहनत घेतात रात्रीचा दिवस करतात. १२ ते १८ तास विद्यार्थी अभ्यास करतात त्यातून त्यांना हे यश मिळते. या परीक्षेत यश मिळवून अधिकारी होण्याचे स्वप्न प्रत्येक विद्यार्थी पाहतो आणि जेंव्हा हे स्वप्न साकार होते तेंव्हा त्याचा आनंद फक्त त्या विद्यार्थ्याला नसतो तर त्याच्या कुटुंबीयांना, नातेवाईकांना, मित्र मंडळींना आणि समाजालाही असतो. असाच आनंद बिरदेव डोणे या गरीब मेंढपाळ असलेल्या विद्यार्थ्याला मिळालेल्या यशानंतर संपूर्ण महाराष्ट्राला झाला आहे. बिरदेव डोणेने जे यश या परीक्षेत मिळवले आहे ते प्रेरणादायी आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील कागल येथील मेंढपाळ कुटुंबात जन्मलेल्या बिरदेवचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण गावातीलच मराठी शाळेत झाले. दहावी बारावीत चांगले गुण मिळाल्यानंतर त्याने अधिकारी होण्याचे स्वप्न पाहिले आणि हे स्वप्न साकार करण्यासाठी त्याने रात्रीचा दिवस केला. पहिल्या दोन प्रयत्नात त्याला यश मिळाले नाही मात्र तिसऱ्या प्रयत्नात मात्र तो यशस्वी झाला आणि देशात ५५१ वी रँक मिळवली. केवळ बिरदेवचीच नव्हे तर या परीक्षेत यशस्वी झालेल्या सर्वच मराठी मुलांची कहाणी प्रेरणादायी आहे. जिद्द आणि ईच्छाशक्तीला मेहनतीची जोड मिळाली तर या जगात काहीही अशक्य नाही हेच या मुलांनी दाखवून दिले आहे. महाराष्ट्रातील या मुलांचे यश पाहून भविष्यात महाराष्ट्रातून आणखी सनदी अधिकारी निर्माण होतील यात शंका नाही. या परीक्षेत यशस्वी झालेले बहुतेक विद्यार्थी मराठी माध्यमातून शिकलेले आहेत हे विशेष. लाखो रुपये डोनेशन भरून इंग्रजी माध्यमात आपल्या मुलांना दाखल करणाऱ्या आणि इंग्रजी माध्यमातून शिकले तरच करियर होते असा समज असणाऱ्यांसाठी तर ही मोठी चपराक आहे. या परीक्षेत यशस्वी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे मनापासून अभिनंदन! सनदी सेवेमध्ये मराठी मुलांचे हे यश पाहून' मराठी पाऊल पडते पुढे!' असेच म्हणावे लागेल.

लेखक
श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# भारतासाठी जागतिक कंटेंट हब बनण्याची सुवर्णसंधी!

जागतिक ऑडिओ-व्हिज्युअल आणि मनोरंजन क्षेत्रातील महत्त्वपूर्ण पर्व ठरणारी 'वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल अ‍ॅण्ड एंटरटेनमेंट समिट (WAVES) 2025' अवघ्या दोन आठवड्यांवर येऊन ठेपली आहे. 1 मे ते 4 मे 2025 दरम्यान मुंबई येथील जिओ कन्व्हेशन सेंटर, बीकेसी येथे होणारी ही भव्य समिट, भारताला जागतिक पातळीवर 'कंटेंट सुपरपॉवर' म्हणून ओळख मिळवून देण्यासाठी एक सुवर्णसंधी ठरणार आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दृष्टिकोनानुसार भारताने क्रिएटिव्ह इकॉनॉमीमध्ये आघाडी घेत असून नेहमीप्रमाणे मुंबईने क्रिएटिव्ह इकॉनॉमीचे नेतृत्व करायला तयार आहे. WAVES 2025 ही केवळ एक शिखर परिषद नाही, तर भारताच्या सर्जनशील शक्तीला, जागतिक गुंतवणुकीला आणि धोरणात्मक बदलांना चालना देणारा परिवर्तनशील क्षण आहे. भारताने याचा उपयोग करून जागतिक कंटेंट क्षेत्रावर आपला ठसा उमटवावा, अशी सर्व क्षेत्रातील तज्ज्ञांची अपेक्षा आहे.

### WAVES 2025: का आहे ही परिषद खास?

भारतामध्ये माध्यम आणि मनोरंजन (Media & Entertainment – M&E) उद्योग हा वेगाने प्रगत होत असलेला आणि रोजगारनिर्मितीच्या दृष्टीने महत्त्वाचा घटक आहे. OTT, ॲनिमेशन, गेमिंग, VFX, चित्रपट, संगीत, आणि डिजिटल मीडिया क्षेत्रात भारताने गेल्या दशकात विक्रमी प्रगती केली आहे. FICCI-EY रिपोर्टनुसार, 2024 मध्ये भारतीय M&E उद्योगाची किंमत $28 अब्जच्या पुढे गेली असून, 2025 पर्यंत तो $34 अब्ज गाठेल असा अंदाज आहे.

याच पार्श्वभूमीवर WAVES 2025 ही परिषद केवळ चर्चासत्रांचे व्यासपीठ नसून, भारतातील सृजनशील उद्योगक्षेत्राला जगभरातील गुंतवणूक, सहकार्य, आणि नवकल्पनांशी जोडणारा सेतू ठरणार आहे.

### भारत - सृजनशील महासत्ता होण्याच्या वाटेवर

भारतात सध्या दरवर्षी 2,000 पेक्षा अधिक चित्रपट तयार होतात, ज्यात 20 पेक्षा अधिक प्रादेशिक भाषा समाविष्ट असतात. OTT प्लॅटफॉर्मवर भारतीय कंटेंटची मागणी केवळ देशातच नव्हे तर अमेरिका, युरोप, मिडल ईस्ट आणि दक्षिण आशियाई देशांमध्येही वाढत आहे. या मागणीचा फायदा घेत, भारताने 'कंटेंट एक्स्पोर्ट हब' होण्यासाठी पावले उचलणे ही काळाची गरज बनली आहे. WAVES 2025 या दिशेने एक निर्णायक टप्पा ठरेल. ही परिषद केवळ संवादाचा नव्हे, तर कृतीशील धोरणनिर्मितीचा केंद्रबिंदू ठरेल, जिथून भारताची M&E क्षेत्रातील भविष्यातील दिशा ठरवली जाईल.

ऑस्कर, कान्स, वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम, दावोसच्या धर्तीवर

### वेव्ह्जचेही दरवर्षी आयोजन

वेव्हज् ही परिषद केंद्र आणि राज्य शासनाच्या सहकार्याने होत आहे. वेव्हजला कायमस्वरूपी एक सचिवालय स्वरूपात पुढे नेण्यात येणार आहे. या परिषदेस एक कायमस्वरूप देऊन दरवर्षी हा कार्यक्रम घेतला जाणार आहे. ज्याप्रमाणे ऑस्कर, कान्स किंवा दाओस येथील वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम सारखा आंतरराष्ट्रीय दर्जाचे आयोजन केले जाते, अगदी त्याचप्रमाणे वेव्ह्ज याचेही दरवर्षी आयोजन केले जाणार आहे. यासाठी एक समर्पित टीम वर्षभर काम करणार आहे.

### वेव्हज परिषदेस 100 पेक्षा जास्त देश होणार सहभागी

सध्या तंत्रज्ञानाचे युग असून ते बदलणारे आहे. या नवीन बदलत्या तंत्रज्ञानाचे नेतृत्व महाराष्ट्राने करावे, यावर जोर देण्यात येत आहे. दृकश्राव्य तसेच मनोरंजन क्षेत्रात क्रियेटिव्ह इकॉनॉमीला एक प्लॅटफॉर्म देण्यात येणार आहे. मुंबई येथे होणाऱ्या या वेव्हज परिषदेस 100 पेक्षा जास्त देश सहभागी होणार आहेत. हा कार्यक्रम यापूर्वी झालेल्या जी 20 पेक्षा खूप मोठा असणार आहे.

### WAVES समिटची वैशिष्ट्ये आणि महत्त्वाचे घटक:

· 'Create in India' वर भर: 'Make in India' पाठोपाठ आता 'Create in India' ही नवी संकल्पना WAVES समिटद्वारे आंतरराष्ट्रीय पातळीवर पुढे नेली जाईल.

· सर्जनशील प्रतिभेला व्यासपीठ: भारतातील प्रादेशिक भाषांतील कंटेंट, ॲनिमेशन आणि गेमिंग क्षेत्रातील नवोदित निर्माते आणि कलाकारांना जागतिक प्लॅटफॉर्मवर आपली कला सादर करण्याची संधी.

· ग्लोबल सहयोग आणि भागीदारी: Netflix, Amazon, Disney+, Sony Pictures यांसारख्या आंतरराष्ट्रीय कंपन्यांसोबत भागीदारीसाठी मार्ग मोकळे होतील.

· तंत्रज्ञान आणि नवोन्मेष यांचा संगम: AI, वर्च्युअल प्रोडक्शन, आणि इंटरॅक्टिव कंटेंटसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानावर सखोल चर्चा.

· धोरणात्मक चर्चासत्रे: धोरणकर्ते, गुंतवणूकदार, कलाकार, तंत्रज्ञ आणि उद्योगपती यांच्यात थेट संवादाची संधी.

· क्रिएट इन इंडिया चॅलेंज – जगभरातील नवोदित निर्मात्यांच्या प्रतिभेचा अविष्कार साजरा करणारा एक अभूतपूर्व उपक्रम, अर्थात मुंबईत होणाऱ्या वेव्हज 2025 मध्ये आपल्या प्रतिभेची झलक दाखवण्यासाठी 'वेव्हज' हे एक आघाडीचे व्यासपीठ म्हणून सज्ज आहे.

· वेव्हेक्स 2025 – हा उपक्रम एक मैलाचा दगड ठरणारा असून यामाध्यमातून मीडिया-टेक स्टार्टअप्स त्यांच्या नवकल्पना आघाडीच्या उद्योग धुरिणांसमोर आणि सेलिब्रिटी एंजल गुंतवणूकदारांसमोर सादर करतील, ज्यामुळे भारताच्या माध्यम आणि मनोरंजन परिसंस्थेच्या भविष्याला नवीन दिशा मिळेल.

· वेव्हज बाजार: चित्रपट, गेमिंग, संगीत, जाहिरात आणि एक्सआर, निर्माते, गुंतवणूकदार आणि इतर व्यवसायांना जोडणारी एक अद्वितीय जागतिक बाजारपेठ. यातूनच उद्योग व्यावसायिकांना उत्पन्नाचे नवीन स्रोत उघडण्याच्या संधी देखील देते.

· मास्टरक्लासेस आणि परस्परसंवादी सत्रे – उद्योगातील दिग्गज आणि जागतिक नेत्यांकडून शिकण्याची, माध्यम, मनोरंजन आणि तंत्रज्ञानाच्या भविष्याबद्दल अंतर्दृष्टी मिळविण्याची एक दुर्मिळ संधी.

लेखन
वर्षा फडके-आंधळे,
उपसंचालक (माहिती) (वृत्त)
माहिती व जनसंपर्क
महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई

# दहशतवादाविरुद्ध सर्व राष्ट्रांनी एकत्र यावे



जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यात २८ भारतीय पर्यटकांचा मृत्यू झाला. या हल्ल्याने भारतातच नव्हे जगभर जगभर खळबळ माजली. या हल्ल्याची जशी भारतात निंदा होत आहे तशीच निंदा जगभर होत आहे. संपूर्ण जग या भ्याड हल्ल्याने हादरून गेले आहे. जगाला हादरवून सोडणाऱ्या या घटनेचे तीव्र पडसाद उमटले आहेत. भारताने दहशतवाद्यांची कोंडी करण्यासाठी ठोस पावले उचलली आहेत. इतकेच नाही तर या हल्ल्यास ठोस प्रतिउत्तर देण्याची तयारीही भारताने सुरू केली आहे. जर भारताने या हल्ल्यास जशास तसे उत्तर दिले आणि दहशतवाद्यांचे अड्डे असलेल्या पाकव्याप्त काश्मीरमध्ये सैन्य घुसवले किंवा सार्जिकल स्ट्राईक केला तर जग भारताच्या बाजूने उभे राहील का ? भारताच्या कारवाईला जगाचा पाठिंबा मिळेल का ? असा प्रश्न विचारला जात आहे जर भारताने दहशतवाद्यांविरोधात कारवाई केली तर भारताला जगाचा पाठिंबा निश्चितपणे मिळेल कारण दहशतवादाने फक्त भारतच नाही तर सारे जग पोळून निघाले आहे. केवळ भारतच नाही जगातील सर्वच प्रमुख देशांना दहशतवादाने ग्रासले आहे. सर्व प्रमुख देशांत दहशतवाद्यांनी केंव्हांना केंव्हा हल्ला केला आहे. मागील वर्षीच रशियाच्या मॉस्को शहरात दहशतवाद्यांनी मोठा हल्ला घडवून आणला होता. रशियाच्या निवडणुकीत पुतीन यांचा एकतर्फी विजय झाल्याच्या काही तासातच रशियाची राजधानी असलेल्या मॉस्को शहरात मोठा दहशतवादी हल्ला झाला होता. या हल्ल्यात रशियाच्या १३३ निरपराध नागरिकांना जीव गमवावा लागला होता. या हल्ल्यात हजारो नागरिक जखमी झाले होते. इसीस या दहशतवादी संघटनेने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली होती. पुतीन यांनी पाचव्यांदा विजय मिळवताच दहशतवाद्यांनी त्यांना ही भेट दिली होती. रशियात झालेला या भीषण हल्ल्याने संपूर्ण जगात चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते कारण इसीसच्या दहशतवाद्यांनी थेट मॉस्को शहरात घुसून हा हल्ला केला होता. रशियाच्या पोलादी सुरक्षेला भेदून दहशतवाद्यांनी हा हल्ला केल्याने रशियाच्या सुरक्षेव्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते जर राशिया सारख्या अभेद्य सुरक्षा व्यवस्था असलेल्या देशात इतका मोठा दहशतवादी हल्ला होऊ शकतो तर मग जगातील कोणत्याची देशात घुसून दहशतवादी हल्ला करू शकतात अशीच चर्चा जगभर होऊ लागली होती आणि त्याची प्रचिती अवघ्या वर्षभरात आली. पाकपुरस्कृत दहशतवाद्यांनी भारतीय हद्दीत घुसून भारतीय पर्यटकांना ठार केले. वर्षभराच्या अंतरात जगातील प्रमुख देश असलेल्या या दोन्ही देशात झालेल्या या दहशतवादी हल्ल्यांनी जगभर भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. जगात दहशतवाद पुन्हा डोके वर काढत आहे हेच या हल्ल्याने सिद्ध होत आहे अर्थात दहशतवाद्यांनी आताच हल्ले सुरू केले आहेत असे नाही . या आधीही दहशतवाद्यांनी अनेक देशात दहशतवादी हल्ले केले आहेत. भारत तर नेहमीच दहशतवाद्यांच्या हिट लिस्टवर राहिला आहे. दहशतवादाची सर्वाधिक झळ भारतालाच बसली आहे. दहशतवादामुळे भारताने दोन पंतप्रधान गमावले आहेत. भारतावर झालेला २६ / ११ चा दहशतवादी हल्ला तर संपूर्ण जगाने पहिला आहे. भारताला जेंव्हा जेंव्हा दहशतवादाची झळ बसली तेंव्हा तेंव्हा संपूर्ण जगाने एकत्र येऊन दहशतवादाचा मुकाबला करावा असे आव्हान भारताने जगाला केले मात्र जगाने त्याला प्रतिसाद दिला नाही त्यामुळे दहशतवाद्यांचे धारिष्ट्य वाढत गेले. दहशतवाद्यांनी केवळ भारतालाच नाही तर अमेरिकेसारख्या महासत्तेला देखील तडाखा दिला आहे. भारत, रशिया, अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, स्पेन, इस्राईल, जपान, दक्षिण कोरिया, ऑस्ट्रेलिया इतकेच नाही तर पाकिस्तानला देखील दहशतवादाची झळ बसली आहे. मध्यंतरी काही काळ शांत असलेले दहशतवादी आता पुन्हा एकदा सक्रिय झाले आहेत. दहशतवादी सर्वच देशात दहशतवादी कारवाया करीत आहे. त्यामुळे दहशतवाद ही आता एका देशाची समस्या राहिली नसून ती वैश्विक समस्या बनली आहे. दहशतवादापासून कोणताच देश अलिप्त राहू शकत नाही. त्यामुळे याचा मुकाबला सर्व देशांनी मिळून करायला हवा. भारताने दहशतवादाविरोधात कारवाई केली तर संपूर्ण जगाने भारताने पाठिंबा द्यायला हवा. दहशतवादा विरोधातील भारताच्या मोहिमेस जगाने पाठबळ द्यावे. दहशतवादा विरोधात संपूर्ण जगाने एक व्हायला हवे. जोवर दहशतवादाविरोधात संपूर्ण विश्व एक होत नाही तोवर दहशतवादाचा हा भस्मासूर रोखणे कठीण आहे. दहशतवादी म्हणजे मानवतेचे शत्रू आहेत. या शत्रूविरुद्ध लढण्यासाठी सर्व राष्ट्रांनी एक होणे ही काळाची गरज आहे.

- श्याम ठाणेदार

# आरोग्य

## उन्हाळ्यात गरम पाणी प्या

1. डिटॉक्सिफिकेशन: गरम पाणी शरीरात जमा झालेले विषारी पदार्थ बाहेर टाकण्यास मदत करते.
2. पचन सुधारते: गरम पाणी पचन सुधारते आणि बद्धकोष्ठतेपासून आराम देते.
3. प्रतिकारशक्ती वाढवते: गरम पाणी प्यायल्याने शरीराची प्रतिकारशक्ती वाढते.
4. वजन कमी करण्यास मदत होते: गरम पाणी प्यायल्याने चयापचय वाढते, ज्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते.
5. त्वचेसाठी फायदेशीर: गरम पाणी प्यायल्याने त्वचा सुधारते आणि मुरुमे दूर होतात.

गरम पाणी पिण्याशी संबंधित काही चुका:

1. खूप गरम पाणी पिणे: खूप गरम पाणी प्यायल्याने तोंडात आणि घशात जळजळ होऊ शकते.
2. रिकाम्या पोटी गरम पाणी पिणे: रिकाम्या पोटी गरम पाणी प्यायल्याने ॲसिडिटी होऊ शकते.
3. साखर मिसळलेले गरम पाणी पिणे: साखर मिसळलेले गरम पाणी पिणे आरोग्यासाठी हानिकारक आहे.

गरम पाणी पिण्याची योग्य पद्धत:

गरम पाणी कोमट असावे : खूप गरम पाणी पिऊ नका, कोमट पाणी प्या.

अन्न खाल्ल्यानंतर गरम पाणी प्या : अन्न खाल्ल्यानंतर अर्ध्या तासाने गरम पाणी प्यावे.

लिंबू किंवा मध मिसळून गरम पाणी पिऊ शकता: लिंबू किंवा मध मिसळून गरम पाणी पिण्याचे अनेक फायदे आहेत.

उन्हाळ्यात गरम पाणी पिण्याचे अनेक फायदे आहेत. त्यामुळे गरम पाणी पिण्याची सवय लावा आणि निरोगी राहा.

# जिल्हा परिषद शाळा बोरिवलीची विद्यार्थिनी शिष्यवृत्ती परीक्षेत तालुक्यात प्रथम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



मुरबाड : जिल्हा परिषद शाळा बोरिवली येथे शिकणारी विद्यार्थिनी कु.मृगाक्षी नितीन राणे इ. ५ वी शिष्यवृत्ती परीक्षेत ३०० पैकी २४६ गुण संपादन करून तालुक्यातून प्रथम आली आहे.

प्राथमिक शिक्षक नितीन दामोदर राणे व अर्चना तुळशीदास मार्के यांची ही मुलगी इयत्ता पहिलीपासूनच तिला जिल्हा परिषद दाखल केले. मंथन स्पर्धा परीक्षा ३०० पैकी २४४ गुण ,नवोदय स्पर्धा परीक्षा १०० पैकी ८८:२५ गुण मिळवून गुणवत्तेची चुनूक दाखवली. तिने मिळवलेल्या या यशाबद्दल तिचे तालुक्यातून सर्व स्तरावर खूप खूप कौतुक होत आहे.

मागे सुद्धा आम्ही बातमी दिली होती. कु. मृगाक्षी नितीन राणे विद्यार्थिने जिल्हा परिषद शाळा बोरिवली येथे कराटेचे प्रशिक्षण शाळेत देत आहे. एकंदरीत सर्वगुणसंपन्न अशी विद्यार्थिनीच कौतुक होणे साहजिकच आहे.

या गोष्टीतून अजूनही शिकायला मिळतेय प्राथमिक शिक्षकांची मुले प्राथमिक शाळेत शिकली तर नक्कीच शाळेची गुणवत्ता वाढीस मदत होईल व शाळेतील इतर विद्यार्थ्यांना त्याची प्रेरणा व आनंद मिळेल.

# तहानलेल्या गावांसाठी हेलपिंग हँड संस्था

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : माळशेज येथील साकुर्ली गाव भीषण पाणी टंचाईचा सामना करत असून तहानलेल्या या गावाला कल्याणमधील हेलपिंग हँड सामाजिक संस्थेने पाण्याचा टँकर मागवून पाण्याची मदत केली आहे. हेलपिंग हँड सामाजिक संस्थेचे सचिन राउत यांना माळशेज येथील साकुर्ली या गावातून व्हिडीओ आला गावात पाण्यावाचून व्यकुळ आहे. महिला विहिरीवर संध्याकाळी 4 वाजता पाण्यासाठी नंबर लावतात शेवटचा नंबर पहाटे 4 वाजता लागतो आणि विहिरीत पाणी फक्त एक वेळेला एक डब्बा शिल्लक. 7 किलोमीटर गावापासून लांब दगडातून हांडे घेऊन महिला जीव घेणा प्रवास करत आहे. तेव्हा हेलपिंग हँड सामाजिक संस्था दुपारी 4 वाजता निघाली जमा झालेली मदत घेवून टँकर मागवून संध्याकाळी 6 वाजता महिलांना पिण्याचे पाणी पूरवले. यामुळे महिलांना सुखाची झोप मिळाली प्यायला स्वच्छ पाणी मिळालं. यामुळे शहरातील सर्व नागरिकांनी एकत्र येऊन टँकर साठी शक्य होईल ती मदत करावी. शक्य होईल त्यांनी टँकर पुरवण्यासाठी शक्य होईल ती मदत करा असे आवाहन सचिन राउत यांनी केले आहे. संपर्क : 8898235366






# डोंबिवलीचा रविंद्र संते भारतीय दिव्यांग क्रिकेट संघाच्या कर्णधार पदी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : डिफरेंटली एबल्ड क्रिकेट कौन्सिल ऑफ इंडिया यांच्या अंतर्गत बंगळूरू येथे भारत आणि श्रीलंका या दोन देशात दिव्यांग क्रिकेट सीरीज होणार आहे. या स्पर्धेत एकूण ५ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने होणार असुन स्पर्धेची सुरुवात दि. २९ एप्रिलला होणार आहे. संपुर्ण भारत देशातुन १८ सदस्यीय भारतीय दिव्यांग क्रिकेट संघ निवडला गेला असुन डोंबिवलीच्या रविंद्र संते याची कर्णधार पदी निवड केली आहे. या स्पर्धेसाठी भारतीय संघ पुर्ण तयारीनिशी सज्ज झाला आहे.

या भारतीय संघात रविंद्र संते (कर्णधार), नरेंद्र मंगोरे (उपकर्णधार), आकाश पाटील, ऋशांत गुंजाळ, गुरुदास राऊत, निखिल मनहास, शिवशंकरा, इम्रान खान, योगेंद्र भदोरिया, माजिद मागरे, आदिल नानसोला, वासिम इक्बाल, मोहम्मद सादिक, सतिश किरार, राजेश कन्नौर, विक्रम जीत, तुषार पॉल, रविंद्र जगदाळे, सपोर्टिंग स्टाफ पंकज गुप्ता (मुख्य प्रशिक्षक) रविंद्र पाटील (सहाय्यक प्रशिक्षक), संकेत खेडकर (वीडियो एनालिसिस), रामस्वरूप सैनी (स्ट्रेंग्थ आणि कंडिशनिंग कोच) यांचा समावेश आहे.




# कठोर कारवाई करून आतंकवाद्यांना कायमचा धडा शिकवा

## ठाणे येथे विविध मागण्या करत हिंदु जनजागृती समितीचे आंदोलन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : काश्मीर खोऱ्यामध्ये व्यापक 'कोंबिंग ऑपरेशन' राबवून अतिरेक्यांचा बीमोड करावा, ज्या परिसरातून सतत अतिरेकी आक्रमणे होत आहेत, तेथे कायमस्वरूपी लष्करी तळ उभारण्यात यावेत. काश्मीरमधील उरलेले हिंदू पर्यटक, व्यावसायिक आणि हिंदु पंडित यांचे जीवित रक्षण करण्यासाठी विशेष सुरक्षा आराखडा लागू करण्यात यावा तसेच भारत सरकारने जिहादी आतंकवाद्यांना आणि त्यांच्या भारतातील हस्तकांना जन्माची अद्दल घडेल, अशी कठोर सैन्य कारवाई करत कायमचा धडा शिकवावा अशा विविध मागण्या करत हिंदु जनजागृती समिती आणि अन्य हिंदुत्वनिष्ठ संघटना यांनी ठाणे येथे आंदोलन केले. या आंदोलनात राष्ट्रप्रेमी नागरिक उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते.

ठाणे पश्चिम येथील सॅटीस पुलाखाली २६ एप्रिलला सायंकाळी ५.३० वाजता केलेल्या आंदोलनात करण्यात आले. आंदोलनकर्त्यांनी पाकिस्तानच्या निषेधाचे फलक हातात धरले होते.




त्यावेळी आंदोलनकर्त्यांनी काश्मीरमध्ये राष्ट्रपती राजवट लागू करा, मोदीजी घुसके मारो देश तुम्हारे साथ है. आतांकवादका एकही नाम पाकिस्तान पाकिस्तान, वंदे मातरम, भारत मातेचा विजय असो, अशा घोषणा देण्यात आल्या. या आंदोलनात बजरंग दल, अखिल भारत हिंदु महासभा, सहयोग गोविंदा पथक, सनातन संस्था, हिंदु जनजागृती समिती या संघटनांच्या प्रतिनिधींसह राष्ट्रप्रेमी नागरिक उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. त्यावेळी शासनाला देण्यात येणाऱ्या निवेदनावर नागरिकांनी उस्फुर्तपणे स्वाक्षऱ्या केल्या.

या हल्ल्यात बळी पडलेले २८ पर्यटक देशभरातील विविध राज्यांतील असल्याने यातून संपूर्ण देशभरात दहशत माजवण्याचा दहशतवाद्यांचा उद्देश स्पष्ट होतो. हत्येचे जे व्हिडिओ आणि छायाचित्रे समाजमाध्यमांवर प्रसारित झाली आहेत, ती पाहिल्यानंतर ही क्रूरता मानवतेलाही लाजवणारी आहे. गेल्या काही काळात हिंदु व्यावसायिक, कर्मचारी, काश्मीरी हिंदूंवर सातत्याने हल्ले होत आहेत. केंद्र सरकारने ३७० कलम रद्द करून काश्मीरला भारतीय घटनेच्या संपूर्ण चौकटीत आणले, निवडणुका घेतल्या, विकासाचे प्रयत्न केले; पण तरीसुद्धा जिहादी अतिरेकी कारवाया थांबायला तयार नाहीत. तसेच असे भीषण दहशतवादी हल्ले स्थानिकांच्या सहभागाशिवाय होणे शक्य नाही. वर्ष १९९० मध्ये ९० हजार हिंदूंची हत्या आणि साडेचार लाख काश्मिरी हिंदूंचे बलपूर्वक विस्थापन अशाच पद्धतीने करण्यात आले होते. आता ही आक्रमणे याच षड्यंत्राचा पुढचा भाग आहेत. त्यामुळे या हल्ल्यात कोणत्या संघटना, नेते वा जिहादी आतंकवादी सहभागी आहेत, हे शोधून त्यांच्यावर 'दशहतवादविरोधी कायद्यां'र्गत कठोर कारवाई करून कायमचा धडा शिकवला पाहिजे, अशी मागणी समितीने केली आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश संघटक सचिव पदी रमझान शेख



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या मान्यतेने व पक्षाचे विधिमंडळ गटनेते जितेंद्र आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली रमझान शेख यांची राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या मुख्यालय पाचपाखाडी ठाणे येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश संघटक सचिव ही महत्वाची जबाबदारी देत नियुक्ती करण्यात आली. पक्षाचे आधारस्तंभ शरद पवार यांनी देशासाठी आणि महाराष्ट्रासाठी केलेल्या कार्यांमधून प्रेरणा घेऊन तसेच जितेंद्र आव्हाड यांची राजकारणातील स्पष्ट भूमिका, जनसामान्यासाठी असलेली त्यांची आपुलकी यातून प्रेरणा घेऊन पक्षासोबत राहून जनसेवेसाठी जीवन अर्पित करण्याचे निर्धार करतो. तसेच पक्षसंघटना मजबूत करण्यासाठी जितेंद्र आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली काम करणार असल्याची प्रतिक्रिया यावेळी रमझान शेख यांनी दिली. याप्रसंगी ठाणे शहर जिल्ह्याचे अध्यक्ष सुहास देसाई, खारघर विभागातील कार्यकर्ते अमीर शाह मिरु, जावेद सय्यद, वाजिद शेख, अश्रफ खान तसेच अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# स्मशानभूमीत बाल कामगार

> ठेकेदाराचा ठेका रद्द करा
> – आ.राजेश मोरे यांची मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : पूर्वेकडील एका स्मशानभूमीत बाल कामगार काम करत असल्याचा व्हिडिओ सामाज माध्यमात व्हायरल होते आहे. याविषयी कल्याण ग्रामीण विधानसभा आमदार राजेश मोरे यांनी तेथील ठेकेदारावर करावाई करावी व ठेका रद्द करावा अशी मागणी प्रशासनाकडे केली आहे.

बाल कामगार (प्रतिबंध आणि नियमन) सुधारणा कायदा, 2016 हा कायदा 1 जानेवारी 2016 रोजी लागू झाला. या कायद्यानुसार 14 वर्षाखालील मुलांना कोणत्याही कामावर ठेवणे पूर्णपणे बेकायदेशीर ठरवले जाते. या कायद्याने 14 ते 18 वयोगटातील मुलांनाही धोकादायक कामांवर काम करण्यास बंदी घातली आहे. 14 वर्षाखालील मुलांवर कामावर बंदी असून



या कायद्यानुसार, 14 वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांना कोणत्याही प्रकारच्या कामावर ठेवता येत नाही. या कायद्याअंतर्गत, बालकामगार (किंवा बाल कामगारांची कामे) शोधल्यास, त्यांची सुटका केली जाते आणि त्यांना पुनर्वसन करण्यासाठी मदत केली जाते.

या कायद्याचे उल्लंघन झाल्यास, संबंधित व्यक्तीला दंडात्मक कारवाईला (जुर्माना किंवा कारावास) सामोरे जावे लागते. या कायद्याचा उद्देश मुलांचे संरक्षण करणे, त्यांना शिक्षणाची संधी देणे आणि बालमजुरीला पूर्णपणे प्रतिबंध करणे आहे.

डोंबिवलीतील स्मशानभूमीत एक लहान मुलगा खादयावर लाकडे उचलत असल्याचा व्हिडिओ व्हायरल होत आहे. याबाबत कल्याण ग्रामीण विधानसभा आमदार राजेश मोरे यांना पत्रकारांनी विचारले असता ते म्हणाले, त्या स्मशानभुमीत बाल कामगार असतील तर तशी माहिती घेतो. जर तिथे बालकामगार असतील तर जो कोणी ठेकेदार असेल त्याचा ठेका रद्द झाला पाहिजे.

# पुस्तके वाचणारी व्यक्ती अनेक आयुष्य जगते

## – प्रा.डॉ.बिपीन वाडेकर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : प्रत्येक लेखकाकडे अलौकिक ऊर्जा असते म्हणूनच एखादं पुस्तक वाचून ते आत्मसात करावं, कारण पुस्तक वाचणारा व्यक्ती अनेक आयुष्य जगतो. न वाचणारा व्यक्ती केवळ एकच आयुष्य जगतो. वाचनासाठी कुणावरही जबरदस्ती करता येत नाही. लहान मुले - तरुणांना सोशलमिडिया पासून दूर ठेवण्याकरिता एक पर्याय म्हणून घराघरांतील टेबलावर पुस्तकं हवीतच. पालकांनी मुलांशी वाचनविषयक चर्चा करावी त्यामुळे मुलांना वाचनाची गोडी लागेल. भ्रमणध्वनीच्या विळख्यातून मुलांना बाहेर



काढण्यासाठी वाचनाची गोडी पालकांनी रुजवावी असे मोलाचे मार्गदर्शन प्रा.डॉ.बिपीन वाडेकर (प्राचार्य बि.के.बिर्ला नाईट कॉलेज,कल्याण) सार्वजनिक वाचनालय कल्याणने जागतिक पुस्तक दिनानिमित्त आयोजित "पुस्तक, चहा आणि बरंच काही" या कार्यक्रमात केले.

वाचन छंद म्हणून जोपासला पाहिजे. तेव्हाच कालपेक्षा आज आपण सरस होऊ शकतो असे मत तरुण वाचक लीना दातार यांनी मांडले. बालभारतीतील संदर्भ पुस्तकांचा अभ्यास शाळा उपक्रमातून राबवावा असे ज्येष्ठ कवी प्रवीण देशमुख म्हणाले. सरचिटणीस भिकू बारस्कर यांच्या संकल्पेतून बाल – तरुण-ज्येष्ठ वाचक यांच्यात संवाद घडवून आणण्याकरिता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

वाचनालयाचे अध्यक्ष मिलिंद कुलकर्णी प्रास्ताविकेत म्हणाले की, अशा विविध उपक्रमांतून वाचनालय वाचनसंस्कृती वृद्धिंगत करण्याचा सातत्याने प्रयत्न करीत असते. तसेच बालवाचक कु.इवा लिबिन अब्राहम हिने बालवयात जमा केलेल्या पुस्तकांचे प्रदर्शन मांडण्यात आले होते. प्रसंगी वाचनालयाचे विश्वस्त ॲड.सुरेश पटवर्धन, उपाध्यक्षा आशा जोशी, कार्यकारिणी सदस्य अरविंद शिंपी, अरुण देशपांडे वाचकवर्ग व ग्रंथसेविका मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांच्या उपस्थितीत मुंबई 'वायएमसीए'चा वर्धापन दिन साजरा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : सर्व धर्म-पंथातील लोकांसाठी खुल्या असणाऱ्या आणि देश, भाषा, धर्म, वर्ण यांच्या पलिकडे जाऊन कार्य करणाऱ्या यंग मेन्स ख्रिश्चन असोसिएसन (वायएमसीए) या धर्मनिरपेक्ष संस्थेचे कार्य उल्लेखनीय आहे. आपल्या दीडशे वर्षांच्या प्रवासात या संस्थने चारित्र्यसंपन्न नागरिक, नैपूण्यपूर्ण खेळाडू आणि सामाजिक जाणिवा असलेली व्यक्तिमत्त्वे घडविली, असे गौरवोद्गार राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी काढले.

राज्यपालांच्या प्रमुख उपस्थितीत 'वायएमसीए' या संस्थेचा 150 वा वर्धापन दिन सोहळा शुक्रवारी (25 एप्रिल) एनसीपीए सभागृह मुंबई येथे पार पडला. यावेळी संस्थेचे राष्ट्रीय महासचिव एन. व्ही. एल्डो, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, उपसचिव एस. राममूर्ती आणि बॉम्बे वायएमसीएचे सदस्य, आजी माजी पदाधिकारी उपस्थित होते.

राज्यपाल सी पी राधाकृष्णन म्हणाले, वायएमसीए हॉस्टेलच्या माध्यमातून निवास व भोजनाची सुविधा निर्माण करुन दिल्यामुळे व्यापारी-उद्योजकांच्या जीवनात या संस्थेने महत्त्वाची भूमिका बजावली. 'वायएमसीए'ने गोरगरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे तसेच क्रीडा क्षेत्राला चालना देण्याचे कार्य यापुढेही सुरु ठेवावे. मुंबईच्या लोकसंख्या वाढीच्या प्रमाणात 'वायएमसीए'ने देखील आपले कार्यक्षेत्र आणि सेवा वाढवणे गरजेचे असल्याचे राज्यपालांनी सांगितले. राज्यपालांच्या हस्ते यावेळी बॉम्बे वायएमसीएच्या 'हाऊ मच कॅन वी डू फॉर अदर्स' या कॉफीटेबल पुस्तकाचे तसेच स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले.

# रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठात 'दीनदयाल उपाध्याय अध्यासन' केंद्र स्थापन करण्यात येणार

## - राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांची घोषणा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी साम्यवाद व भांडवलशाही यांचा सुवर्णमध्य साधत एकात्म मानवतावादाचा सिद्धांत मांडला होता. दीनदयाल उपाध्याय यांचे विचार युवकांमध्ये पोहोचवण्यासाठी रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठात 'दीनदयाल उपाध्याय अध्यासन' स्थापन करण्यात येईल, अशी घोषणा राज्यपाल तथा विद्यापीठांचे कुलपती सी पी राधाकृष्णन यांनी केली.

पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी मुंबईतील रुईया महाविद्यालयात दिनांक 22 ते 25 एप्रिल 1965 या कालावधीत 'एकात्म मानवतावाद' या विषयावर व्याख्याने दिली होती. या व्याख्यानमालेच्या हीरक महोत्सवानिमित्त रुईया महाविद्यालय येथे आयोजित चर्चासत्राला राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी संबोधित केले. कार्यक्रमाला केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्री पियुष गोयल, कौशल्य व रोजगार मंत्री मंगल प्रभात लोढा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सुरेश सोनी, दीनदयाल शोध संस्थेचे सरचिटणीस अतुल जैन, विविध विद्यापीठांचे कुलगुरु उपस्थित होते.

राज्यपाल सी पी राधाकृष्णन म्हणाले, साधी राहणी व उच्च विचारसरणी असलेल्या उपाध्याय यांच्या विचारांना प्रत्यक्ष कृतीत आणण्याचे कार्य माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी केले. तसेच सध्याच्या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देखील या कार्याला पुढे घेऊन जात आहेत. ग्रामीण भागात रस्ते, गरिबांना गॅस कनेक्शन, पेयजल या योजना त्याचाच परिपाक आहेत. कोरोना काळात पाश्चात्य देशांनी लस शोधली असती तर तिची किंमत जनतेच्या आवाक्यात राहिली नसती. मात्र, भारताने संपूर्ण देशवासियांना मोफत कोरोना प्रतिबंधक लस दिली आणि त्यापलीकडे जाऊन अनेक देशांना मोफत लस उपलब्ध करुन दिली. हा सर्वसमावेशक विचार पंतप्रधान श्री. मोदी यांनी पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्याकडूनच अंगिकारला आहे, असे राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी सांगितले.

वास्तवाचे भान ठेवून अन्न वाया जाऊ देऊ नये, प्रत्येकाने धन अर्जन करावे परंतु अनावश्यक खर्च करू नये तसेच स्वतःसाठी न जगता इतरांसाठीही जगावे हा दीनदयाल उपाध्याय यांचा विचार स्वीकारला पाहिजे, असेही राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी सांगितले.

# शिर्डीत मुरबाडच्या मिमिक्री मॅन गणेश देसलेंचा सत्कार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : श्री साई संस्थान विश्वव्यवस्था शिर्डी येथे दरवर्षी प्रमाणे साई भक्ती गीतांचा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमांमध्ये मुरबाडच्या मिमिक्री मॅन गणेश देसलेंचा सत्कार करण्यात आल्याने गणेश देसले यांचा सर्वत्र कौतुक होत आहे.

गायक जगदिश पाटिल आणि ग्रुप यांचा साई भक्ती गिंताचा कार्यक्रम पार पडला .या कार्यक्रमात आपल्या आवाजाने संपूर्ण महाराष्ट्र गाजवणारा एक अवलिया ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील एकलहरे गावातिल नांमवत असलेला हा कलाकार म्हणजे गणेश देसले मिमिक्री मॅन असं या हरहुन्नरी कलाकाराच नाव गणेश देसले बद्दल सांगायचं म्हटलं तर गणेश २०० पेक्षा अनेक कलाकारांचे हुबेहूब आवाज काढतो याच गणेश देसले मिमिक्री मॅन याचा रामनवमी निमित्त श्री साई संस्थान शिर्डी येथे मिमिक्री शो चालु असताना अनेक हजारो



साई भक्तांच्या समोर आपल्या जादुई आवाजाने मिमिक्री मॅन गणेश देसले यांनी साई भक्तांना मंत्रमुग्ध केले असता. श्री साई स्वतांन शिर्डी येथे या गुणी कलाकाराचा मिमिक्री मॅन गणेश देसलेचा सत्कार करण्यात आला. प्रेक्षकांना वेड लावणारा मुरबाडचा मिमिक्री मॅन गणेश देसले यांचा मिमिक्री आवाज गणेश देसले मराठी सिनेसृष्टीतील नाना पाटेकर ,अक्षय कुमार निळू फुले सयाजी शिंदे कॉमेडी किंग जॉनी लिव्हर, महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायिका गान कोकिळा लता मंगेशकर यांचा आवाज अगदी हुबेहूब काढतात त्याच प्रकारे ज्यांनी अनेक चित्रपट सुपर डुपर हिट आहेत. आपल्या सर्वांचे लाडके अमिताभ बच्चन यांचा आवाज खूप छान काढतात. मकरंद अनासपुरे हृतिक रोशन साउथ सुपरस्टार रजनीकांत , अल्लू अर्जुन, अंकुश चौधरी ,चला हवा येऊ द्या भाऊ कदम राजकुमार ,सनि देओल निलेश साबळे ,भारत गणेशपुरे वेड चित्रपट अभिनेता रितेश देशमुख साऊथ ॲक्टर प्रकाश राज , विजय राज अशाप्रकारे शिंदेशाही आनंद शिंदे, आदर्श शिंदे यांची सुद्धा आवाजे काढतात, राजकीय नेत्यांचे हुबेहूब आवाज स्वर्गीय नेते हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे, लोकनेते शरद पवार , रामदास आठवले पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच इत्यादी नामवंत कलाकारान बरोबरच गाजलेल्या सैराट, या चित्रपटातील, परश्या म्हणजेच आकाश ठोसर याच्या आवाजाची मिमिक्री अफलातून करत आहे.

## भारत गौरवाने डॉ. विजय दहिफळे सन्मानित




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर विलक्षण प्रतिभा व बुद्धिमत्तेच्या जोरावर समाजात असाधारण कार्य करणाऱ्या महिला, पुरुष व संस्थांच्या कार्याला सन्मानित करण्याचे काम रेडियंट टॅलेन्ट बुक ऑफ रेकॉर्ड द्वारा केले जाते. लैंगिक शिक्षणाचे महत्त्व समाजात रुजविण्यात महत्वाचे योगदान देणाऱ्या डॉ. विजय दहिफळे यांना आरोग्य सेवेतील बहुमूल्य कामगिरी बद्दल या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रख्यात लेखक डॉ. क्रांती महाजन यांच्या अध्यक्षतेखालील नॅशनल ज्युरींच्या हस्ते डॉ. दहिफळे यांना भारत गौरव पुरस्कार तथा आंतरराष्ट्रीय प्रमाणपत्र, स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

# मुरबाड बस स्थानकात चोरांचा सुळसुळाट

## मुरबाड पोलीस व बस आगार प्रवाशांना सुरक्षा पुरविण्यात अपयशी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : गेले अनेक वर्ष मुरबाड शहरातील नागरिकांच्या झालेल्या चोरीच्या घटनांचा तपास गुलदस्त्यात असताना शुक्रवारी मुरबाड शहरात आठवडी बाजार भरत असल्याने गर्दीचा फायदा घेत एसटी मध्ये चढत असलेल्या एका वृद्ध इसमाचे ५० हजार रुपये चोरणाऱ्या चोरट्याला प्रवाशांनी पकडून मुरबाड पोलिसांच्या ताब्यात दिले असल्याची घटना घडली आहे.बँकेतून एका वृद्ध इसमाने ५० हजार रुपये काढून आपल्या गावी जाण्यासाठी मुरबाड एसटी स्टँड मधील एसटी मध्ये चढत असताना एका पाकीटमाराने ते पैसे चोरून पळून जाण्याचा प्रयत्न केला मात्र एसटी स्टँड मध्ये बिसलरी



पाणी बॉटल विक्री करणाऱ्या तरुणाच्या ही चोरीची बाब लक्षात येताच आरडाओरडा केल्याने प्रवाशांनी त्या चोरट्याला पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले.

> **मुरबाड बस स्थानकात यापुर्वी अनेक महिला प्रवाशांचे दागिने तसेच पैंसे चोरीच्या घटना घडल्या आहेत त्यांचाही तपास गुलदस्त्यात असून मुरबाड बस स्थानक चोरांचा अड्डा झाला असल्याचे दिसत असून आगार व्यवस्थापंकाडून तसेच मुरबाड पोलीसांकडून प्रवाशांच्या पैंसे,दागिन्यांच्या सुरक्षेसाठी कोणतीही उपाय योजना केली नसल्याने बस प्रवाशांमध्ये प्रचंड नाराजी दिसुन येत आहे.**

मुरबाड बाजारपेठेतील असणाऱ्या बँका गेली वर्षभरापासून एमआयडीसी तसेच हायवेलगत गेल्याने नागरिकांच्या होणाऱ्या पायपीट व चोरांच्या नजरा टिपून बसलेल्या असून नागरिकांच्या जीवाशी बँक खेळ खेळत आहे. नागरिकांचा पैसा असुरक्षित असल्याच्या भावना व्यक्त होत आहेत. त्याकडे पोलीस यंत्रणेचआ सुध्दा यंत्रणेचा दुर्लक्ष होत आहे. मुरबाड शहरात शुक्रवारी आठवडी बाजार भरत असल्याने तालुक्यातील अनेक नागरीक जीवनावश्यक सामान भरण्या साठी गर्दी करतात. याच गर्दीचा फायदा घेऊन हे मुरबाड बाहेरून येणारे पाकीटमार चोरटे लुटमार करीत असल्याचे बोलले जाते. मुरबाड एसटी स्टँड मध्ये महिलांच्या पैशांच्या पर्स, सोन्याचे दागिने व पाकीटमारिच्या घटना अनेकदा घडल्या आहेत. यात पुरुषांसह महिला चोर ही बाहेरून शुक्रवारी मुरबाड मध्ये येत असल्याची चर्चा आहे.



# पशुधन विकास अधिकाऱ्यांची २७९५ पदांसाठी भरती




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : राज्य शासनाच्या पशुसंवर्धन विभागात 'पशुधन विकास अधिकारी' या संवर्गाची 2795 पदे भरली जाणार आहेत. या पदांसाठी उमेदवारांना 29 एप्रिल 2025 पासून 19 मे 2025 पर्यंत आपला अर्ज सादर करता येणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे देण्यात आली आहे.

राज्य शासनाच्या कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या मागणीवरून महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (MPSC) पशुधन विकास अधिकारी, महाराष्ट्र पशुसंवर्धन सेवा, गट-अ या संवर्गातील पदभरतीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. याअंतर्गत पशुसंवर्धन विभागात 'पशुधन विकास अधिकारी' या संवर्गाची 2795 पदे भरली जाणार आहेत. सामाजिक व समांतर आरक्षणानुसार पदांचा तपशील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. उमेदवारांनी अर्ज करताना आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी आवश्यक त्या प्रमाणपत्रांची पूर्तता करणे बंधनकारक आहे.

# पेणमध्ये गावठी कट्टा दाखवून लुटणाऱ्या टोळीला अटक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : मुंबई-गोवा महामार्गावर पेणजवळील तरणखोप गावाच्या हद्दीत एका जोडप्याला गावठी कट्टा दाखवून लुटण्याप्रकरणी पेण पोलिसांनी सातजणांना अटक केली.सतीश वासुदेव सावंत (रा. लालबाग, मुंबई) हे लक्झरी बसने मूळ गावाकडे (वरेरी, ता. देवगड) पत्नीसह जात असताना लक्झरी बसमध्ये सावंत यांच्या बाजूला बसलेली प्रवासी महिला (रा. तळवडे, ता. देवगड)हिच्याशी खिडकी उघडण्यावरून वादविवाद झाला. याचा राग मनात धरून तरणखोप येथील न्यू मिलन हॉटेलजवळ बस थांबली असता, या महिलेने आपल्या सहा साथीदारांना बोलावून सावंत यांना मारहाण केली. गावठी कट्टा दाखवून जिवे ठार मारण्याची धमकी दिली. त्यांच्या गळ्यातील १ लाख २० हजार रुपये किमतीची २० ग्राम सोन्याची साखळी व १४ हजार रोख रक्कम घेऊन ते पसार झाले. ही घटना १८ सप्टेंबर २०२४ रोजी घडली होती.याप्रकरणी पेण पोलीस ठाण्यात आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली अन्वेषण अधिकारी समद बेग व पथकाने केला.यातील २७ वर्षीय महिला तसेच अक्षय सुभाष धुरी (२६, मूळ रा. मु.पो. तळवडे, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग, सध्या रा. गोवंडी मुंबई), गौरव संतोष धुरी (२८),अजय ऊर्फ जय संजय लोखंडे (२७, मूळ रा. मु.पो. तोंडापूर, ता. जामनेर, जि. जळगाव, सध्या रा. गोवंडी पूर्व मुंबई), दर्शन संतोष धुरी (२९), संतोष शांताराम धुरी (५७), दीपक अनिल मोरे (२०, मूळ रा. मिलिंद नगर, दर्यापूर, ता. भुसावळ, जि. जळगाव, सध्या रा. गोवंडी) यांना अटक केली आहे. याबाबत अधिक तपास पो. निरीक्षक संदीप बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली पेण पोलीस करीत आहेत.

# आम्ही नगरकर व स्फूर्ती फाऊंडेशनच्या रस्ता दुरुस्ती लढ्याला यश




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : आम्ही नगरकर व स्फूर्ती फाउंडेशन वतीने कल्याण -माळशेज घाट -आळेफाटा रस्ता दूरूस्ती साठी १ मे २०२५ रास्ता रोको करून मोठी आंदोलनाची तयारी करण्यात आली होती, गेल्या ६ महिन्यांपासून यावर तयारी सुरू होती. यामध्ये हजारो प्रवासी,नागरिकांसह , शिवप्रेमी सहभागी होणार होते. हा आवाज महाराष्ट्रात नाही तर दिल्ली पर्यंत पोहचवण्याचा निर्धार होता, तसे निवेदन आम्ही नगरकर व स्फूर्ती फाउंडेशन वतीने कार्याध्यक्ष बजरंग तांगडकर, आम्ही नगरकर चे विरेंद्र जाधव, जेष्ठ पत्रकार व शिवचरित्र व्याख्याते यांनी मुरबाड प्रांताधिकारी, तहसिलदार, मुरबाड पोलिस स्टेशन, टोकावडे पोलिस स्टेशन, वाहतूक वरिष्ठ पोलीस निरीक्षक मुरबाड यांना दिले होते. त्याचबरोबर मुरबाड आमदार किसन कथोरे यांना निवेदन देण्यात आले त्याक्षणी आमदार किसन कथोरे यांनी तत्काळ तत्परता दाखवत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने अधिकाऱ्यांशी फोनवर संवाद साधला व आपणास आंदोलन

> 'रस्त्याचे काम १५ मे पर्यंत पूर्ण करणार
> – आ किसन कथोरे

करण्याची गरज पडणार नाही, त्वरीत मंगळवार दि. २९ एप्रिल पासून संपूर्ण रस्ता डांबरीकरण काम करण्यास सुरुवात होईल व १५ मे पर्यंत पूर्ण होईल अशी माहिती दिली.हे करत असताना वन विभाग परवानगी मुळे सिमेंट रस्ता काम सुरू होणे अपेक्षित होते परंतु त्याला विलंब झाल्याने आता आंदोलनांची पार्श्वभूमी , प.महाराष्ट्र नागरीकांची गावाला जाताना गैरसौय टाळण्यासाठी संपूर्ण रस्ता डांबरीकरण करण्यात येणार असल्याची व त्यानंतर पुन्हा संपूर्ण रस्ता सिमेंटिकरण करण्यात येईल असे स्पष्ट प्रतिपादन आमदार किसन कथोरे यांनी आम्ही नगरकर व स्फूर्ती फाउंडेशन शिष्टमंडळाला दिले.तसेच येणाऱ्या काळात माळशेज घाट पर्यटन दृष्टीने जगातील सर्वात मोठ काचेचा पूल, ६ लेन टनेल काम सुरू होईल ज्यामुळे प्रवास अधिक सुखकारक होईल अशी माहिती शिष्टमंडळाला दिली व आंदोलन स्थगित करण्याचे आवाहन केले. यावेळी उपस्थित आम्ही नगरकर व स्फूर्ती फाउंडेशन शिष्टमंडळाला आमदार किसन कथोरे यांनी दिलेल्या शब्दाची दखल घेत कार्याध्यक्ष बजरंग तांगडकर यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. तसेच आम्ही नगरकर प्रतिष्ठानचे अध्यक्ष मंगेश शेळके, कार्याध्यक्ष बजरंग तांगडकर , संचालक मंडळ पदाधिकारी प्रशांत आहेर, तानाजी कर्पे, हिरा आवारी, विरेंद्र जाधव, विक्की फापाळे, नितिन भराट, शशिकांत पात्रे, शिल्पा तांगडकर आम्ही नगरकर व स्फूर्ती फाउंडेशन पदाधिकारी यांनी आमदार किसन कथोरे यांचे आभार मानले.




# पारंपरिक वादये प्रशिक्षणाची कार्यशाळा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /कल्याण : कल्याण-डोंबिवलीकरांना आता हलगी आणि घुमके ही पारंपरिक वाद्ये शिकण्याची अभिनव संधी मिळणार आहे. शिवमुद्रा प्रतिष्ठानतर्फे या लोकवाद्यांच्या प्रशिक्षणाचे कार्य सुरू करण्यात आले आहे. प्रतिष्ठान महाराष्ट्राची संस्कृती वाढवण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे. ढोल व ताशा वादनासोबत लेझीम, बरची, झांज, ध्वज या पारंपरिक व मर्दानी खेळांप्रमाणे वाद्य संस्कृती वाढवण्यासाठी कटिबद्ध असल्याचे प्रतिष्ठानच्या अंकुर आहेर यांनी स्पष्ट केले. यासाठी प्रतिष्ठानने लोककला प्रबोधिनीची सुरुवातही केली आहे. या माध्यमातून प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षिका; तसेच पारंपरिक वाद्य शिकण्याची आवड असणाऱ्यांसाठी हलगी व घुमके यांची प्रशिक्षण कार्यशाळा १ ते ८ मे दरम्यान संध्याकाळी ५ ते ७ या वेळेत पार पडेल. हर्षल भुणभुणे हे वाद्य प्रशिक्षक प्रशिक्षण देणार आहेत. कल्याण पश्चिम येथील मुरबाड रोडवरील रेल चाईल्ड संस्थेचे सरस्वती मंदिरात प्रशिक्षण पार पडेल, असे आहेर यांनी सांगितले. अधिक माहिती साठी संपर्क : 9867682130, 8104001910

# वाढत्या तापमानात नागरिकांनो स्वतःची काळजी घ्या – डॉ. अमोल गिते

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : आजकाल तापमान 40 टक्के डिग्री पेक्षा जास्त झाले आहे. ठाणे आणि एमएमआरडीए परिसरात बांधकामाचे, रस्त्यांचे, मेट्रोचे कामे चालु आहेत त्यामुळे उष्णता वाढली आणि लोकांनी स्वतःची काळजी न घेतल्यामुळे उष्णामध्ये गेल्यामुळे सनस्ट्रोकचे रुग्ण वाढले आहे. नागरिकांनी काम नसताना दुपारचे वेळेत गरज नसताना उन्हामध्ये जाऊ नये. शक्यतो घरातच आपले कामकाज करावे व ऑफिसमध्ये असेल तर ऑफिसमध्ये काम करावे. डिलिव्हरी बॉय किंवा उन्हामध्ये काम करणारे नागरिक असतील तर त्यांनी स्वतःची काळजी घ्यावी. छत्रीचा वापर करावा, डोक्यावरती रुमाल घ्यावे जेणेकरून त्याच्या



पासून बचाव करता येईल. वाढत्या तापमानामध्ये नागरिकांनी स्वतःची काळजी घ्यावी घ्यावी असे आवाहन सिद्धिविनायक हॉस्पिटलचे संचालक डॉ.अमोल गिते यांनी प्रसार माध्यमाच्या माध्यमातून केले आहे.

वाढत्या उष्णतेमुळे नागरिकांना व्हायरल फीवर, खोकला, डीहायड्रेशन, जुलाब, उलट्या असे आजार प्रामुख्याने होतात. पण लोकांनी चांगला आहार व स्वतःची काळजी घेतली तर त्यामधून बचाव करता येतो. आहारामध्ये बदल करावा. आहारामध्ये लोकांनी शीतपेय, कोल्ड्रिंक्स टाळावे, साधं पाणी, पायनॅपल, टरबूज, संत्री मोसंबी असे जास्त पाण्याचे प्रमाण असलेले फळे खावे. तसेच बाहेरचे चमचमीत पदार्थ,रस्त्यावरतीचे व उघड्यावरील पदार्थ खाणे टाळावे, जास्त आहार घेऊ नये. साधारण आहार व पचन होईल असा आहार घ्यावा. जास्त उष्णतेमध्ये जास्त आहार घेतल्यास उलट्या होऊ शकतात, मळमळ होऊ शकते. त्यामुळे शक्यतो संतुलित आहार घ्यावा आणि वारंवार पाणी पीत राहावे. पालेभाज्या व फळे यांचे सेवन जास्त करत राहावे.

> 'सिद्धिविनायक हॉस्पिटल नेहमीच प्रत्येक प्रसंगांमध्ये नागरिकांना मदत करण्याची भूमिका घेत असते. त्यामुळे संस्ट्रोक किंवा हिट स्ट्रोकचे रुग्ण असतील आजूबाजूला त्यांचे नातेवाईक नसतील परिसरातील लोकांनी त्यांना उचलून आपल्या हॉस्पिटल आणले. अनोळखी व्यक्ती असेल रस्त्यावर चक्कर येऊन पडला तर आजोबाच्या लोकांनी त्यांना उचलूनसिद्धिविनायक हॉस्पिटल मध्ये आणावे. खर्चाची काळजी करू नये. सिद्धिविनायक हॉस्पिटल त्यांना मोफत उपचार करेल. सिद्धिविनायक हॉस्पिटल नेहमीच सामाजिक बांधिल जपत असते. अशा रुग्णांसाठी आम्ही पूर्ण मदत करत आहोत. ठाणेकरांनी स्वतःची काळजी स्वतः घ्यावी व व्यवस्थित आहार घ्यावा वा उष्णामध्ये जाण्याचे ताळावे.
> – डॉ. अमोल गिते,संचालक,सिद्धिविनायक हॉस्पिटल, ठाणे

# त्या अतिरेक्यांचा केंद्र सरकार बदला घेणार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता / डोंबिवली : पहलगाम येथील अतिरेकी हल्ला हा देशावर झालेला आघात असून देशाच्या नेतृत्वामध्ये एअर फोर्स, नेव्ही, मिलिटरी या सर्व यंत्रणा सतर्क आहेत. त्यामूळे निश्चितपणे याचा बदला घेतल्याशिवाय राहणार नाही अशा शब्दात वनमंत्री गणेश नाईक यांनी डोंबिवलीत आपल्या भावना व्यक्त केल्या.

दोन दिवसांपूर्वी काश्मिरच्या पहलगाम येथे झालेल्या अतिरेकी हल्ल्यामध्ये डोंबिवलीच्या संजय लेले, हेमंत नाईक, अतुल मोने या तिघा पर्यटकांचा मृत्यू झाला. या तिघांच्या कुटुंबियांच्या भेटीसाठी वनमंत्री गणेश नाईक डोंबिवलीत आले होते.

अतिरेकी हल्ल्याविरोधात केंद्र सरकारने तातडीने पाऊले उचलायला सुरुवात केली असून पाकिस्तानच्या नागरिकांना तुम्ही देश सोडून जाण्यास सांगितले आहे. तसेच आपल्या देशातले जे नागरिक पाकिस्तानमध्ये कामानिमित्त गेलेले आहेत त्यांनाही देशात परत येण्यास सांगण्यात आले आहे. निश्चितपणे देशाच्या नेतृत्वामध्ये आणि संपूर्ण एअर फोर्स, नेव्ही, मिलिटरी या सर्व यंत्रणा सतर्क असून निश्चितपणे या हल्ल्याचा बदला घेतल्याशिवाय येथील जनता राहणार नाही असे सांगितले.

अतिरेक्यांच्या हल्ल्यामध्ये मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांच्या कुटुंबावर आघात तर झालाच आहे. परंतु हा देशावर झालेला आघात असून निश्चितपणे अमानुषपणे वागणाऱ्या लोकांना देशाचे नेतृत्व कठोर शिक्षा दिल्याशिवाय राहणार नाही. त्यासाठी देशातल्या सर्व जनतेच्या भावना एकवटल्याचे वनमंत्री नाईक यांनी यावेळी स्पष्ट केले.

तर व्यक्तिगत जीवनामध्ये सहानुभूती आम्ही दाखवू शकतो, परंतु गेलेला जीव तर परत आपण आणू शकत नाही. परंतु यांच्या मृत्यूनंतर जो प्रक्षोभ

> - वनमंत्री गणेश नाईक

देशामध्ये उसळलेला आहे एकूणच जे वातावरण झाले आहे देशांमध्ये निश्चितपणे भविष्य काळामध्ये अशा दृष्ट प्रवृत्तीच्या लोकांना धडा शिकवला जाईल.

आपल्या देशातले नागरिक मृत्युमुखी पडले असून त्यांना अमानुषपणे त्यांना मारण्यात आले आहे. ज्या निर्दोष लोकांची हत्या झाली याचा निषेध केलाच पाहिजे. आणि सर्व देश या भावनेच्या पाठीमागे एकवटला पाहिजे असेही गणेश नाईक यांनी पुढे सांगितले.

# पडघा ग्रामपंचायतीच्या विकासकामांचे भूमिपूजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : वाढत्या नागरीकरणामुळे चर्चेत असलेल्या भिवंडी तालुक्यातील पडघा ग्रामपंचायतीच्या विकासकामांचे भुमीपुजन विवीध मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात करण्यात आले.

सरपंच रविंद्र विशे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून ग्रामपंचायत कार्यालयातील आपले सरकार सेवा केंद्राचे उद्घाटन सरपंच विशे यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच ग्रामपंचायत निधीतुन पडघा गावातील मणीयार आळी, अचानक नगर, राजेश गवळी यांच्या घराच्या मागील बाजूस पेव्हर ब्लॉक, रस्ता तयार करणे व जनसुवीधा योजनेंतर्गत पडघा- भादाणे रस्त्यावरील श्री समर्थ बैठक हॉलसमोर पेव्हर ब्लॉक रस्ता, नवीन आर. सी. सी. स्मशानभूमी तयार करणे



ही कामे प्रस्तावित असुन या विकासकामांचे भुमीपुजन शिवसेना नेते प्रकाश पाटील आमदार शांताराम मोरे, भाजयुमो माजी जिल्हाध्यक्ष श्रीकांत गायकर, सरपंच रविंद्र विशे यांच्या हस्ते शनिवारी करण्यात आले या विकासकामांमुळे नागरीकांना याचा फायदा होणार आहे. तर सरपंच रविंद्र विशे व ग्रामपंचायत कमीटी गावात करीत असलेल्या विकासकामांचे शिवसेना नेते प्रकाश पाटील आमदार शांताराम मोरे यांनी कौतुक करुन रवींद्र विशे यांना छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रतिकृती (पुतळा) भेट देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी उपसरपंच निता दास ग्रामपंचायत सदस्य, शैलेश बिडवी, अभिषेक नागावेकर, मयूरेश गंधे, रश्मी तेलवणे,नयना जाधव, सायली पाटील, ग्रामपंचायत अधीकारी भास्कर घुडे, पडघा सोसायटीचे माजी सभापती गुरूनाथ मते, माजी सरपंच शशाक तांबोळी, संजय जाधव, प्रताप विशे, रूपेश तेलवणे, अविनाश दास, गुरूनाथ मोरे उपस्थित होते.




# मावळी मंडळाच्या मैदानावर राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : श्री मावळी मंडळ संस्थेच्या वतीने शताब्दी वर्ष व १०० व्या शिवजयंती उत्सवानिमित्त ७२ व्या राज्यस्तरीय पुरुष व महिला गटाची कबड्डी स्पर्धेचे उदघाटन संस्थेच्या भव्य क्रीडानगरीत खासदार नरेश म्हस्के ह्यांच्या हस्ते व विशेष अतिथी कल्याण जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, माजी नगरसेवक सुधीर कोकाटे, ठाणे विधानसभा शहरप्रमुख हेमंत पवार, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट अध्यक्ष सुहास देसाई उपस्थित होते. त्यांच्याबरोबर संस्थेचे अध्यक्ष सुधाकर मोरे, उपाध्यक्ष सुनील करंजकर, चिटणीस रमण गोरे, उप चिटणीस संतोष सुर्वे, सहाय्यक चिटणीस चिंतामणी पाटील, खजिनदार रिक्सन फर्नांडीस, विश्वस्त प्रभाकर सुर्वे, विश्वस्त कृष्णा डोंगरे, विश्वस्त पॅट्रिक फर्नांडीस, विशवस्त केशव मुकणे यांचे उपस्थित करण्यात आले.

यावर्षी संस्था शताब्दी वर्ष साजरे करीत असल्यामुळे स्पर्धेच्या इतिहासात महिला व पुरुष गटात दोन्ही मिळून १०० संघाचा समावेश करण्यात आला आहे. संस्थेच्या शतक महोत्सवीवर्षानिमित्त छत्रपती पुरस्कार, अर्जुन



पुरस्कार, दादोजी पुरस्कार व द्रोणाचार्य पुरस्कार प्राप्त क्रीडापटूंना सन्मानित करण्यात येत आहे. स्पर्धेच्या पहिल्या दिवशी छत्रपती पुरस्कार प्राप्त सुनील जाधव, मेघाली कोरगांवकर म्हसकर, रेबीक्का गवाटे, जेष्ठ पत्रकार सुहास जोशी व सुधीर खानोलकर यांचा सत्कार करण्यात आला.महिला गटातील उदघाटनीय सामन्यात शिवशक्ती महिला संघ (मुंबई शहर), शिवशक्ती महिला संघ (धुळे), आकाश स्पोर्ट्स क्लब (मुंबई उपनगर), स्फूर्ती सेवा मंडळ (ठाणे) या संघानी विजय मिळवीत दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. तर पुरुष गटातील उदघाटनीय सामन्यात श्रीराम क्रीडा विश्वस्त मंडळ(मुंबई शहर), जॉयकुमार स्पोर्ट्स क्लब (ठाणे), पार्ले स्पोर्ट्स क्लब (मुंबई उपनगर), ओम वर्तक नगर (ठाणे), नवरत्न क्रीडा मंडळ (ठाणे) या संघानी विजयी सलामी देत दुसऱ्या फेरीत प्रवेश केला आहे.

सदर स्पर्धेच्या महिला गटातील उदघाटनीय सामन्यात मुंबई उपनगरच्या आकाश स्पोर्ट्स क्लब संघाने ठाण्याच्या शिवतेज क्रीडा मंडळाचा ३३-२३ असा १० गुणांनी पराभव करीत दुसऱ्या फेरीत प्रवेश केला . तनिषा भद्रिके व धनश्री कोकाटे यांच्या प्रभावी खेळामुळे आकाश स्पोर्ट्स क्लब संघाने मध्यंतराला १९-१० अशी आघाडी घेतली. पराभूत संघाकडून संगम यादव हिने एकाकी लढत दिली. महिला गटातील दुसऱ्या सामन्यात ठाण्याच्या स्फूर्ती सेवा मंडळाने मुंबई उपनगरच्या टागोर नगर मित्र मंडळाचा ५८-४४ असा १४ गुणांनी पराभव करीत दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. सदर सामन्यात स्फूर्ती सेवा मंडळाने मध्यंतराला २९-१५ असा १४ गुणांची आघाडी घेतली . स्फूर्ती सेवा मंडळाच्या दीपाली पागडे हिच्या उत्कुष्ट चढाया केल्या व तिला नूतन चव्हाण हिने पक्कडीमध्ये उत्तम साथ देत संघास विजय मिळवून दिला. पराभूत संघाकडून दीपाली इंगवले व स्वाती गोगावले ह्यांनी चांगल्या खेळाचे प्रदर्शन केले.

पुरुष गटातील उदघाटनीय सामन्यात मुंबई उपनगरच्या ओवळी क्रीडा मंडळाने ठाण्याच्या ग्रीफिन्स जिमखाना संघाचा ३४-२८ असा ६ गुणांनी पराभव केला. सदर सामन्यात मध्यंतराला ग्रीफिन्स जिमखाना संघाकडे १८-११ अशी ७ गुणांची आघाडी होती. ग्रीफिन्स जिमखाना संघाच्या मनीष धनावडेने उत्कृष्ट चढाया करीत संघाकडे मध्यंतरापर्यंत आघाडी घेतली. मध्यंतराला पिछाडीवर असतानाही रितिक सोनावणे व आकाश सकपाळ यांच्या प्रभावी कामगिरीने संघाने विजय खेचून आणला. मध्यन्तरानंतर पराभूत संघाकडून ग्रीफिन्स जिमखाना संघाच्या तेजस कदम ह्यांनी उत्कृष्ट खेळ करीत संघाचा पराभव टाळण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. पुरुष गटातील दुसऱ्या सामन्यात मुंबई शहरच्या श्रीराम क्रीडा विश्वस्त मंडळाने मुंबई उपनगरच्या टागोर नगर मित्र मंडळाचा ४८-३२ असा १६ गुणांनी पराभव केला. सदर सामन्यात मध्यंतराला श्रीराम क्रीडा विश्वस्त मंडळाकडे २३-१८अशी ५ गुणांची आघाडी तुषार शिंदेच्या उत्कुष्ट चढाईमुळे घेतली. मध्यन्तरानंतर टागोर नगर मित्र मंडळाच्या शार्दुलने एकाकी झुंज देण्याचा प्रयत्न केला. पण श्रीराम क्रीडा विश्वस्त मंडळाने उत्कुष्ट खेळ करीत सामना एकतर्फी जिंकला. पुरुष गटातील तिसऱ्या सामन्यात ठाण्याच्या जॉयकुमार स्पोर्ट्स क्लब संघाने मुंबई उपनगरच्या हनुमान क्रीडा मंडळाचा ४२-२७ असा पराभव केला. मध्यंतराला हनुमान क्रीडा मंडळाकडे ३०-१० अशी २० गुणांची आघाडी दित्य चौधरी आणि अमित मुकादम यांच्या अष्टपैलू खेळामुळे घेतली. पराभूत संघाकडून देव गुंजाळ व प्रतीक हेरकर यांनी चांगला खेळ केला.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024